**सहकारी अधिकारी-(प्रथम श्रेणी), सहकारी संस्था, जव्हार तालुका, जिल्हा-पालघर**
**(अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाडा तालुका, जिल्हा- पालघर).**
**यांचे कार्यालय.**

मा. अपर जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, तळ मजला, शासकीय विश्रामगृह समोर, जव्हार, जिल्हा- पालघर.

---

जा.क्र.स.अ.श्रे-१/बी.१/जव्हार/.७७(अ)/देवकीनंदन हौ./ 303 /२०१७
दिनांकः- १८ /१२/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(१) अन्वये आदेश.

ASSISTANT REGISTRAR CO-OP. SOCIETY (TS) WADA

वाचले :- १) सौ. आशा मधुकर गोलवड व इतर २४ सदस्य यांचा दि.३१/०७/२०१७ रोजीचा अर्ज.
२) या कार्यालयात दि.१२/१०/२०१७, दि. ०७/११/२०१७ व दि. २१/११/२०१७ रोजी घेण्यात आलेल्या सुनावण्या.
३) संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी दि. ३०/११/२०१७ रोजी दिलेले राजीनामे.
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(१) मधील तरतुदी .

ज्याअर्थी, देवकीनंदन को ऑप हौसिंग सोसायटी लि., (यापुढे या नांवाने वाचावे),गोरवाडी, जव्हार, ता. जव्हार, जिल्हा पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे) नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) सदर संस्था सहकारी कायदयांअंतर्गत नोंदणीकृत झाली असून तिचा नोंदणी क्रमांक टिएनए/जेएचएस/एचएसजी/(टिओ)/६८५/२००२/सन २००२, दि.०९/१२/२००२ असा आहे. आणि,

ज्याअर्थी, सदरची संस्था ही सहकारी कायदयाअंतर्गत नोंदणीकृत झाली असल्यामुळे सहकारी कायदयानुसार व पोटनियानुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद सौ. आशा मधुकर गोलवड व इतर २४ यांनी संस्थेच्या गैरकारभाराबाबत या कार्यालयाकडे दिनांक ३१/०७/२०१७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रार अर्जामध्ये संस्थेच्या कामकाज नियमानुसार चालत नसल्याबाबत व संस्थेत गैरव्यवहार होत असल्याबाबत विविध मुद्दे नमूद केलले आहेत. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयामध्ये दि. १२/१०/२०१७, दि. ०७/११/२०१७ व दि. २१/११/२०१७ रोजी घेण्यात सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत. सुनावणीस संस्थेचे अनेक सभासद हजर होते. उपस्थित सभासदांनी संस्थेची विद्यमान कमिटीपैकी केवळ अध्यक्ष व सचिव कार्यरत असून कमिटी अस्तित्वात नाही असे नमूद केलेले आहे, आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ मध्ये दिलेल्या तरतुदी नुसार समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा व्यवस्थापन समितीने कार्य करण्याचे बंद केलेले आहे. तसेच अध्यक्ष व सचिव यांनी संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राजीनामे दिलेले आहेत त्यामुळे व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करण्याची तरतुद दिलेली आहे. आणि.,

ज्याअर्थी, संस्थेच्या सभासदांनी दि. १३/१२/२०१७ रोजी या कार्यालयाकडे पत्र देवून संस्थेवर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर पत्रात संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याऐवजी संस्थेतील १) श्री. आनंदराव राजाराम नांगरे २) श्री किसन लक्ष्मण तुमडा व ३) श्री. विलास हरी पाटील यांचे प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्ती करण्यांत यावे असे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. आणि.,

..२..

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, उपरोक्त संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांनी संदर्भ क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राजीनामे दिलेले आहेत. त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज चालवण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मंडळ नियुक्त करणे क्रमप्राप्त झालेले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त बाबी विचारात घेता पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी व्ही. व्ही. पाटील, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाडा तालुका, जि. पालघर देवकीनंदन को ऑप हौसिंग सोसायटी लि. गोरवाडी, जव्हार, ता. जव्हार, जिल्हा पालघर या संस्थेवर खालीलप्रमाणे प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मंडळ म्हणून नियुक्त करीत आहे.

**प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मंडळ**

१) श्री. आनंदराव राजाराम नांगरे,

२) श्री किसन लक्ष्मण तुमडा,

३) श्री. विलास हरी पाटील

सदरचा आदेश आज दिनांक १८/१२/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिलेला आहे.

(व्ही.व्ही.पाटील )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाडा तालुका, जिल्हा- पालघर.

ASSISTANT REGISTRAR, CO-OP. SOCIETIES (TTD) WADA

ठिकाण :- जव्हार
दिनांक :-१८/१२/२०१७

**प्रति,**

१) श्री. आनंदराव राजाराम नांगरे.

२) श्री किसन लक्ष्मण तुमडा.

३) श्री. विलास हरी पाटील.

२/- त्यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ताबा घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. कायद्याने सदर आदेशास मुदतवाढ देता येत नसल्याने, विहित मुदतीत सर्व सुचनाचे पालन करावे व संस्थेची निवडणूक घेणेकामी नमुना ई-१, ई-२,व ई-३ नमुन्यातील मतदार यादी या कार्यालयास सादर करावी.

४) अध्यक्ष/सचिव,
देवकीनंदन को ऑप हौसिंग सोसायटी लि. गोरवाडी, जव्हार, ता. जव्हार, जिल्हा पालघर.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या संपूर्ण दप्तराचा ताबा प्राधिकारी अधिकारी मंडळाकडे देऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५) शाखा व्यवस्थापक, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा-जव्हार.

६) संस्थेच्या नोटीस बोर्डावर.

७) सग्रह.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाडा तालुका, जिल्हा- पालघर.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner